# सभेचा कार्यवृत्तांत

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची तिसरी सभा सोमवार दि.२७/३/०६ रोजी दुपारी १२-३० वा.** विद्यापीठाच्या मुख्य कार्यालयात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. डॉ. इरेश स्वामी - कुलगुरु. | अध्यक्ष | उपस्थित. |
| २) | श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे. | सदस्य | उपस्थित. |
| ३) | श्री. रामदास पी. सब्बन. | सदस्य | उपस्थित. |
| ४) | मा. प्रधान सचिव, उच्च शिक्षण, मुंबई. | सदस्य | अनुपस्थित. |
| ५) | मा. सचिव, तंत्र शिक्षण, मुंबई | सदस्य | अनुपस्थित. |
| ६) | मा. संचालक (उ.शि.) यांचे प्रतिनिधी<br>मा. सहसंचालक (उ.शि.) कोल्हापूर. | सदस्य | उपस्थित. |
| ७) | डॉ. एल. पी. देशमुख. | सदस्य | उपस्थित. |
| ८) | संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ - पदसिध्द. | सदस्य | उपस्थित. |
| ९) | प्राचार्य जे. के. बिले. | सदस्य | उपस्थित. |
| १०) | प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर. | सदस्य | उपस्थित. |
| ११) | डॉ. मोरे पी. जी. | सदस्य | उपस्थित. |
| १२) | श्री. एन. बी. पवार. | सदस्य | उपस्थित. |
| १३) | श्रीमती एन. व्ही. साठे. | सदस्य | उपस्थित. |
| १४) | श्री. पी. एम. हिरेमठ. | सदस्य | उपस्थित. |
| १५) | श्री. व्ही. तिरुपती. | सदस्य | उपस्थित. |
| १६) | प्राचार्य बी. पी. रोंगे. | सदस्य | उपस्थित. |
| १७) | डॉ. डी. डी. रणनवरे. | सदस्य | उपस्थित. |
| १८) | श्री. जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील. | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित.* |
| १९) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम. | सदस्य | उपस्थित. |
| २०) | वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित | उपस्थित. |
| २१) | परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित | उपस्थित. |
| २२) | डॉ. पी. बी. कुंभार - कुलसचिव | सचिव | उपस्थित. |

*मा. जयसिंह मोहिते-पाटील सदस्य व्यवस्थापन परिषद यांनी दि.२६/३/०६ रोजीच्या पत्रानुसार व्यवस्थापन परिषदेच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याबाबत कळविले होते. त्यानुसार त्यांची विनंती मान्य केली.

आपणां सर्वांचे सहकार्य विद्यापीठाला व प्रशासनाला मिळाले आहे आणि ते पुढेही मिळणारच आहे. व्यवस्थापन परिषदेमध्ये चर्चेस येणारे विषय आणि त्यावर झालेली चर्चा या बाबी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणे योग्य नाही असे मा.अध्यक्ष यांनी यावेळी सुचविले. आजच दैनिक पुढारी या वृत्तपत्रामध्ये "विजेच्या धसक्याने विद्यापीठ देणार बुधवारी सुट्टी" या आशयाचे वृत्त सविस्तर प्रसिध्द केले आहे असे वृत्त प्रसिध्द झाल्याने विद्यापीठाबाबत गैरसमज निर्माण होतो. म्हणून सर्व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी व्यवस्थापन परिषदेच्या विषयपत्रिकेची गोपनीयता राखावी.

व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये झालेली चर्चा किंवा इतर ज्या बाबी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करावयाच्या असतात त्या मा.कुलगुरु यांच्या परवानगीने मा.कुलसचिव यांच्या सहीनेच प्रसिध्दीसाठी वृत्तपत्राकडे पाठवाव्यात असे चर्चेमध्ये ठरले.

[कृ.मा.प.]

सभेतील विषयांवर खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**विषय क्र. [ १ ]** **दि. ३ फेब्रुवारी २००६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र. [ १ ]** पान क्र. ५ वर, १००६ अशी टंकलेखनाची चूक झालेली आहे त्याऐवजी २००६ लिहावे अशी दुरुस्ती डॉ. एल. पी. देशमुख यांनी सुचविली.

व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी अनुपस्थित रहाण्याबाबत लेखी विनंती केली असेल त्यांना अनुपस्थित राहण्याची परवानगी द्यावी आणि इतिवृत्तामध्ये "विनंतीनुसार अनुपस्थित" असा उल्लेख करावा, जे सदस्य अनुपस्थित रहाण्याबाबत कळविणार नाहीत त्यांच्यासमोर "अनुपस्थित" असा उल्लेख करावा असे डॉ. पी. जे. केचे सहसंचालक,उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग कोल्हापूर तथा मा. संचालक, उच्च शिक्षण विभाग पुणे महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनिधी यांनी सुचविले.

पान क्र. २ वर, दीक्षांत समारंभाच्या कार्यक्रमास पाहुणे म्हणून बोलाविताना व इतर धोरणात्मक कार्यक्रमास पाहुणे आमंत्रित करीत असताना याबाबतची माहिती व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना देण्यात यावी असे प्राचार्य जे. के. बिले यांनी सुचविले.

यानंतर दि. ३ फेब्रुवारी २००६ रोजीच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून दुरुस्तीसह कायम करण्यात आला.

[कृ.मा.प.]

**विषय क्र. [ २ ]** **साप्ताहिक सुट्टी रविवारऐवजी बुधवारी करणेबाबत.**

दर बुधवारी भारनियमनामुळे विद्यापीठ आवारात विद्युत पुरवठा पूर्णपणे खंडीत करणेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्या कार्यालयाकडून निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक बुधवारी विद्यापीठाकडील कामकाज पूर्णपणे बंद राहते. या गोष्टीचा विचार करता जोपर्यंत भारनियमन पूर्ववत होत नाही तोपर्यंत सुट्टीच्या दिवसात बदल करण्याचा प्रशासकीय निर्णय घेणे आवश्यक आहे. प्रत्येक बुधवार ऐवजी प्रत्येक रविवारी विद्यापीठाचे कामकाज सुरु ठेवणे व रविवारची सुट्टी बुधवारी देणे हा बदल भारनियमन सुरु असेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात करण्यात यावा. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनुसार हा बदल सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व संलग्नित महाविद्यालये व संस्था यांना कार्यवाहीसाठी कळविण्यात येईल तसेच याबाबत शासनास कळविण्यात येईल. याबाबत सर्व व्यवस्थापन परिषद सदस्यांना परिपत्रक ठरावाची टिपणी पाठविण्यात आलेली आहे. सदरची बाब माहितीसाठी व मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. [ २ ]** **या विषयासंदर्भात सविस्तर चर्चा होऊन साप्ताहिक सुट्टी रविवार ऐवजी बुधवारी करणेबाबत खालील समितीचे गठन करण्यात यावे असे ठरले.**

**१) डॉ. पी. जी. मोरे - अध्यक्ष,**
**२) डॉ. एल. पी. देशमुख - सदस्य**
**३) प्राचार्य जे. के. बिले - सदस्य**

**या समितीने आठ दिवसात अहवाल मा.कुलगुरु यांना सादर करावा आणि अहवालाच्या आधारे मा.कुलगुरु यांनी निर्णय घ्यावा असे ठरले.**

**विषय क्र. [ ३ ]** **सोलापूर विद्यापीठाकडील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जादा कामाचा मोबदला (Overtime) विद्यापीठ स्थापनेपासून मंजूर करण्याची बाब..**

सोलापूर विद्यापीठाची स्थापना दि. २२ जुलै २००४ रोजीच्या महाराष्ट्राच्या अधिसूचनेनुसार झालेली असून प्रत्यक्ष कामकाजास दि. १ ऑगस्ट २००४ पासून सुरुवात झालेली आहे. स्थापनेनंतर विद्यापीठाच्या कामकाज करणेसाठी ४१ शिक्षकेतर कर्मचारी नव्याने झालेल्या सोलापूर विद्यापीठाकडे शासनाच्या अधिसूचनेनुसार वर्ग करण्यात आले आहेत. विद्यापीठाच्या कामकाजाचा वाढता व्याप लक्षात घेता सध्या असलेल्या कर्मचाऱ्यांकडून काम करुन घेणे शक्य नाही. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्थापनेपासून केलेल्या जादा कामाचा मोबदला (overtime) मिळणे आवश्यक आहे. सोलापूर विद्यापीठास शिवाजी विद्यापीठाचे नियम व परिनियम लागू असल्याने सोलापूर विद्यापीठाकडील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शिवाजी विद्यापीठाकडील नियमाप्रमाणे जादा कामाचा मोबदला (overtime) अदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. [ ३ ]** **शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जादा कामाचा मोबदला देण्याबाबत अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी खालील समितीचे गठन करण्यात यावे असे ठरले.**

**१) प्राचार्य. बी. पी. रोंगे - अध्यक्ष.**
**२) श्रीमती एन. व्ही. साठे - सदस्या.**
**३) डॉ. सी. बी. कोळेकर - सदस्य.**
**४) डॉ. एल. पी. देशमुख - सदस्य.**
**५) डॉ. पी. जी. मोरे - सदस्य.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र. [ ४ ] प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सहाय्यकांच्या कामाचे मानधन अदा करणेबाबत.**

विद्यापीठ अधिविभागातील वेगवेगळ्या विषयातील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी त्या त्या विषयातील तज्ञ व सहाय्यक यांचे सहाय्य घेतले जाते. संबंधित तज्ञ त्या त्या विषयातील शिक्षक असल्याने त्यांना नियमानुसार मानधन अदा करण्यात येते. विद्यापीठ अधिविभागातील प्रात्यक्षिक परीक्षेत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सुध्दा सहाय्य घेतले जाते. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अशा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मानधन अदा करीत नाही.

महाविद्यालयीन स्तरावर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेच्या कामाचे मानधन दिले जाते. तेव्हा विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मानधन देण्याचा प्रस्ताव विचारार्थ.

**ठराव क्र. [ ४ ] प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सहाय्यकांच्या कामाचे मानधन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे जे नियम आहेत तेच सोलापूर विद्यापीठासाठी लागू करावे असे ठरले.**

**विषय क्र.[५] कॉम्प्युटर सायन्स विभागाकडील हंगामी शिक्षकांना गुणवत्तेच्या निकषावर कंत्राटी पध्दतीच्या नेमणुका देणेबाबत...**

(टिपणी : कॉम्प्युटर सायन्स विभागाकडेतीन अधिव्याख्यात्यांच्या जागा असून त्यांना हंगामी स्वरुपाच्या नेमणुका दिल्या जातात. सदर पदावर उत्तम गुणवत्तेचे शिक्षक मिळणेसाठी सदर पदावर कंत्राटी पध्दतीने ५ वर्षासाठी नेमणुका करणे योग्य वाटते. सदर कोर्स/विभाग हा स्वावलंबी तत्वार चालत असून यासाठी दरवर्षी सुमारे १२ लाख फी पोटी जमा होतात. तसेच फी वाढीचा प्रस्ताव ही विद्यापरिषदेकडे सादर केला आहे. सदर कोर्स साठी जर कंत्राटी पध्दतीने नेमणूका केल्या तर कोर्सची गुणवता वाढून उत्पन्नातही वाढ होणे शक्य आहे. तसेच अशाच प्रकारच्या नेमणुका मुंबई व पुणे विद्यापीठात करणेत आल्या आहेत. म्हणून सदर प्रकारच्या नेमणूका करणे प्रशासकीय दृष्टीनेही योग्य वाटते.

सदर निर्णय धोरणात्मक असल्याने विचारार्थ सादर.)

**ठराव क्र.[५] कॉम्प्युटर सायन्स विभागाकडील हंगामी शिक्षकांना गुणवत्तेच्या निकषावर कंत्राटी पध्दतीने नेमणुका देणेबाबत विभागप्रमुख संगणकशास्त्र विभाग आणि वित्त व लेखा अधिकारी यांनी संपूर्ण तपशीलासह (एकूण उत्पन्न, एकूण खर्च, तरतूद, यंत्राचा घसारा, दुरुस्ती इ.) बाबींचा विचार करुन हा विषय पुढील सभेत सादर करावा असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[६] विद्यापीठाच्या अखत्यारीत विभागातील संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्ती देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

सोलापूर विद्यापीठाच्या वेगवेगळ्या विभागात प्राध्यापकांच्या संशोधनास उत्तेजन देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असताना पदव्युत्तर विभाग असताना सुरु असलेली संशोधन शिष्यवृत्ती सोलापूर विद्यापीठातही सुरु करणे गरजेचे आहे. प्रत्येक वर्षी एक शिष्यवृत्ती दिल्याने मान्यता प्राप्त मार्गदर्शक, शिक्षक व विद्यार्थ्यांचा संशोधनाकडे कल वाढेल. सदर शिष्यवृत्ती व्यवस्थापन परिषदेला महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (०) नुसार मान्य करता येते. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र.[६] विद्यापीठाच्या अखत्यारितील विभागात संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक अनुदानित विभागातील एका विद्यार्थ्यांस रु.१०००/- प्रमाणे प्रति महिना रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यास मान्यता देण्यात यावी आणि रु.१५००/- वार्षिक कॉँन्टिन्जेन्सीज् खर्चासाठी म्हणून देण्यात यावेत तसेच याबाबतची नियमावली संचालक महाविद्यालये व विद्यापीठविकास मंडळ यांनी तयार करावी असे ठरले.**

**विषय क्र.[७] विद्यापीठात सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या ग्रंथालय शुल्क, प्रयोगशाळा शुल्क तसेच इतर शुल्काबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून समिती गठीत करणेबाबत विचारार्थ.**

विद्यापीठात सुरु असलेल्या अभ्यासक्रमांचे निरनिराळे शुल्क हे शिवाजी विद्यापीठाच्या पूर्वीच्या दराने आकारले जात आहेत. बराच कालावधी झाला तरी त्यात कोणताही बदल झालेला नाही. शिवाजी विद्यापीठाने त्यांच्या शुल्कामध्ये बदल केलेला आहे. तरी सोलापूर विद्यापीठामधील सदर अभ्यासक्रमाच्या ग्रंथालय शुल्क, प्रयोगशाळा शुल्क तसेच इतर शुल्क वाढीबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ.

**ठराव क्र.[७] विद्यापीठात सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या ग्रंथालय शुल्क, प्रयोगशाळा शुल्क तसेच इतर शुल्काबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी खालील समिती गठीत करावी असे ठरले.**

**१) प्राचार्य जे. के. बिले - अध्यक्ष.**
**२) डॉ. पी. जी. मोरे - सदस्य.**
**३) डॉ. डी. डी. रणनवरे - सदस्य.**
**४) वित्त व लेखा अधिकारी - सदस्य.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[८] विद्यापीठाने नवीन महाविद्यालयाच्या प्रस्तावाच्या शिफारशी न केलेल्या संस्थांना शुल्क परत करणेबाबतची बाब विचारार्थ..**

शैक्षणिक संस्थांनी नवीन महाविद्यालयांच्या संलग्नतेसाठी सादर केलेले प्रस्ताव शासनाकडे विद्यापीठाच्या शिफारशीसह पाठविले जातात. महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाकडून या प्रस्तावाची छाननी करुन व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने प्रस्तावाच्या शिफारशी शासनाकडे पाठविल्या जातात. ज्या प्रस्तावाची विद्यापीठाकडून शिफारस केली जात नाही. त्या संस्थांना प्रस्ताव सादर करताना जमा केलेले शुल्क काही प्रमाणात इतर विद्यापीठाकडून परत केले जाते. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडून ५०% व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्याकडून २५% शुल्क संस्थेस परत केले जाते. सोलापूर विद्यापीठाकडे मागील दोन वर्षाच्या प्रस्तावावर व यापुढे ज्या प्रस्तावावर विद्यापीठाकडून शिफारशी केल्या जात नाहीत, अशा संस्थांचे शुल्क परत करण्याची बाब विचारार्थ.

**ठराव क्र.[८] ज्या संस्थांच्या प्रस्तावाची शिफारस विद्यापीठाकडून शासनाकडे केली जात नाही. अशा संस्थांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार शुल्क परत करण्यात यावे तसेच परत करावयाच्या संलग्नता शुल्काचे शीर्षक (Budget Head) "Refund of Affiliation Fees" या नांवाने सुरु करावे असे ठरले.**

[कृ.मा.प.]

**विषय क्र.[९] दलित मित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा येथील विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे केलेल्या तक्रारीबाबत नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल विचारार्थ...**

दलित मित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा येथील विद्यार्थ्यांनी श्री. चंद्रकांत मारुती जाधव या गुंड प्रवृत्तीच्या विद्यार्थ्याला प्राचार्य पाठीशी घालत आहे. या विषयाबाबत दि. १८/१/२००६ रोजी विद्यापीठाकडे तक्रार दिली होती. सदर तक्रारीबाबत विद्यापीठाने त्रिसदस्यी चौकशी समिती नेमली होती. सदर समितीने दि. २४/१/२००६ रोजी सदर महाविद्यालयास भेट देवून दि. १६/२/२००६ रोजी विद्यापीठाकडे चौकशी अहवाल सादर केलेला आहे. सदर महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी जावक क्र. ४९?/२००५-०६ दि.२०/१/२००६ अन्वये चौकशी समिती कोणाची चौकशी करणार? आणि चौकशी समितीतील सदस्य प्रा. मठपती यांच्याबद्दल आक्षेप घेतला आहे. याबाबत विद्यापीठाने सदर महाविद्यालयाच्या प्राचार्यास पत्र क्र. सोविसो/यूटीवाय/ॲफी/१५७५/५९२४ दि. १ मार्च २००६ अन्वये विद्यापीठाचा अवमान का केला? याबाबतचे स्पष्टीकरण मागविण्यात आलेले आहे. सदर अहवालात समितीने विद्यापीठाकडे चुकीची पत्रे पाठवून विद्यापीठाची दिशाभूल करणाऱ्या, विद्यापीठाचे आदेश डावलणाऱ्या व महाविद्यालयातील वातावरण दूषित करु पाहणाऱ्या प्राचार्य व प्राचार्यांना पाठीशी घालणाऱ्या संस्थाचालकांवर कारवाई होणे आवश्यक आहे. अशा शिफारशी समितीने केलेल्या आहेत. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव क्र.[९] **(अ) दलित मित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज मंगळवेढा येथील विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे केलेल्या तक्रारीबाबत नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालाची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**(ब) श्रीमती एस. जी. मोहोळकर यांचा शासनाने महाविद्यालयाकडे जमा केलेला थकीत पगार मा.डॉ.पी.जे.केचे सहसंचालक उच्च शिक्षण,कोल्हापूर यांनी संस्थेस पत्राव्दारे कळविल्यानुसार अध्यक्ष या नात्याने सौ. मिनाक्षी कदम यांनी प्राचार्याकरवी आजच्या तारखेपासून आठ दिवसाच्या आत सभेत मान्य केल्यानुसार देण्याची व्यवस्था करावी.**

**(क) मा.सहसंचालक उच्च शिक्षण,कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे पत्र क्र.शिससं/उशि/कोवि/४४१-४६दि.२३/०१/२००६ अनुसार व तसेच संस्थेच्या अध्यक्षा सौ.मिनाक्षी कदम यांनी सभेत मान्य केल्याप्रमाणे सौ. मोहोळकर यांच्या हजेरीपत्रकामध्ये सह्या घेण्यात याव्यात व त्याप्रमाणे त्यांना कामकाज करु देण्यात यावे.**

**श्री. बिचितकर यांना दि.९/३/०६ रोजी संचालक,उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य यांनी महाविद्यालयाच्या भेटीच्या वेळी ठरल्याप्रमाणे इतर महाविद्यालयात समायोजन करण्यासाठी मा. सहसंचालक,उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग यांनी प्रस्ताव पाठवला आहे, त्याचा पाठपुरावा मा. सहसंचालक,उच्च शिक्षण,कोल्हापूर यांनी मान्य केल्यानुसार करावा.**

**सदर महाविद्यालयाची विद्यापीठाकडे प्रलंबित असलेल्या कामाबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[१०] श्री. सिध्देश्वर शिक्षण मंडळाद्वारा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सोलापूर यांच्या प्रभारी प्राचार्य यांचा दंड भरण्याबाबत..**

श्री. सिध्देश्वर शिक्षण मंडळद्वारा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सोलापूर या महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य नियुक्त करण्याबाबत वारंवार कळवूनही कार्यवाही होत नाही. सदर प्राचार्य पदावर नेमणूक केलेल्या उमेदवारी पूर्ण कागदपत्रे इकडील कार्यालयाकडे उपलब्ध होत नाहीत तसेच वेळेत मान्यता घेत नाही. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर परिपत्रक जावक क्र.ॲफी/टे.१/प्राचार्य/२३६७ दि.१७/६/२००२ या अशी मान्यता न घेतल्यास दरमहा रुपये १००० दंड रक्कम (रुपये १०००*४४ महिने = ४४०००/-) भरलेली नाही.

सदर संस्थेवर शुल्क न भरल्याने दंडात्मक कार्यवाही माहितीसाठी विद्यापरिषदेच्या विचारार्थ विषय क्र. २२ ने ठेवला असता विद्यापरिषदेने दंडात्मक कार्यवाही करण्यासाठीचा विषय विद्यापरिषदेच्या अखत्यारीत येत नसलयाने हा विषय व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करावा असा ठराव झाला आहे. सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

ठराव क्र.[१०] **श्री.सिध्देश्वर शिक्षण मंडळाव्दारा कॉलेज ऑफ अर्किटेक्चर,सोलापूर यांनी रु.१०००/- दरमहा प्रमाणे ४४ महिन्याचे रु.४४,०००/- दंड आकारण्यात यावा आणि तो एक महिन्यात भरावा असे कळवावे असे ठरले.**

**ज्या महाविद्यालयांनी प्रभारी प्राचार्य पदास मान्यता घेतलेली नाही त्यांचेवर उपरोक्त नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात यावी. ज्या ज्या महाविद्यालयामध्ये प्राचार्य पदाची नेमणुक करण्यात आलेली नाही त्यांनी कायमस्वरुपी प्राचार्य पद नियुक्त करण्याची कार्यवाही करणेबाबत संबंधितांना कळविण्यात यावे असेही ठरले.**

**विषय क्र.[११] विद्यापीठाचा सन २००५-०६ चा सुधारित व सन २००६-०७ चा वार्षिक अंदाजपत्रक विचारार्थ.**

**टिपणी** महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १०१ (१) अन्वये विद्यापीठाचा सन २००५-०६ चा सुधारित व सन २००६-०७ चा वार्षिक मसुदा अंदाजपत्रक तयार करणेसाठी नियुक्त केलेल्या समितीने तयार केलेला आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ७५ (२) (फ) अन्वये सदर अर्थसंकल्प कायदा कलम (इ) अन्वये वित्त व लेखासमितीने दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी शिफारस केली आहे.सदरची बाब मान्यतेसाठी सादर.

ठराव क्र.[११] **विद्यापीठाचा सन २००५-२००६ चा सुधारित व २००६-२००७ चे वार्षिक अंदाजपत्रकास खालील दुरुस्तीसह मान्यता देण्यात आली.**
**पान क्र. ४८ वर Solid State Physics या अभ्यासक्रमासाठी केलेली तरतूद रु.६०,०००/- ऐवजी रु.१,००,०००/- तसेच Physics साठी रु. ८०,०००/-ऐवजी १,००,०००/- तरतूद २००५-०६ च्या सुधारित अंदाजपत्रकात करण्यात यावी असे ठरले.**

**२००६-२००७ या शैक्षणिक वर्षापासून M.Ed अभ्यासक्रम सोलापूर विद्यापीठात सुरु करण्यात येणार असल्याने त्यासाठी स्वतंत्र बजेट हेड उघडण्यास व त्याअंतर्गत रु.३,००,०००/- तरतूद करण्यात यावी असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[१२]** **सन २००४-०५ चे वार्षिक हिशेब,ताळेबंदपत्रक व लेखा परीक्षण अहवाल विचारार्थ.**

**टिपणी** महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम २० मधील परिच्छेद (४) अन्वये विद्यापीठाचे १ ऑगस्ट २००४ ते ३१ मार्च २००५ या कालावधीचे लेखे, ताळेबंदपत्रक व लेखा परीक्षक अहवाल विद्यापीठ सनदी लेखापरीक्षकाने सादर केलेला आहे. तेव्हा विद्यापीठाचे १ ऑगस्ट २००४ ते ३१ मार्च २००५ या कालावधीचे Income and Expenditure Account, Balance sheet व लेखा परीक्षक अहवाल वित्त व लेखासमितीने व्यवस्थापन परिषदेच्या अंतिम मंजूरीसाठी शिफारस केली आहे सदरची बाब मान्यतेसाठी सादर.

ठराव क्र.[१२] **सनदी लेखा परीक्षकांनी तपासून सादर केलेले आणि वित्त व लेखा समितीने शिफारस केलेले, १ ऑगस्ट २००४ ते ३१ मार्च २००५ या कालावधीचे Income and Expenditure Account, Balance sheet व लेखा परीक्षण अहवाल मान्य करावा असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[१३]** **विद्यापीठाचे लेखा परीक्षकाच्या मानधना बाबत...**

**टिपणी** दि १/८/२००४ ते ३१/३/२००५ या कालावधीचे लेखा परीक्षण मे.सी आर.दोशी ॲन्ड कंपनी यांच्याकडून करुन घेतले आहे. वित्त व लेखा समितीने खालील प्रमाणे शिफारशी केल्या आहेत. सदरच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

अ) मे.सी.आर.दोशी ॲन्ड कंपनी यांनी १ ऑगस्ट २००४ ते ३१ मार्च २००५ या कालावधीचे लेखापरीक्षण केले आहे, त्यांनी ऑडीट फी रु १०,०००/- (+ सर्व्हिस टॅक्स ) मिळावी असे पत्र दिले होते, सदरची ऑडीट फी देण्यासंबंधीची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करावी.

ब) मे. सी.आर.दोशी ॲन्ड कंपनी यांनी सन २००५-०६ व २००६-०७ या कालावधीचे लेखापरीक्षण करण्यासाठी त्यांची नियुक्ती करण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे व अनुक्रमे रु.१५,०००/- (+ सर्व्हिस टॅक्स ) व रु.२०,०००/- (+ सर्व्हिस टॅक्स ) ऑडीट फी ची मागणी केली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर करावी अशी शिफारस करण्यात आली.

क) आयकर तसेच टी.डी.एस. संबंधी सल्ला, टी.डी.एस. त्रैमासिक रिटर्न्स दाखल करणे इ. कामासाठी नाममात्र रु २,०००/- वार्षिक शुल्क देण्यासंबंधी मे.सी.आर.दोशी यांनी विनंती केली होती, त्यांना कर सल्लागार म्हणून वार्षिक शुल्क रु २,०००/- (+ सर्व्हिस टॅक्ससह ) देण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.

ठराव क्र.[१३] **लेखा परीक्षकाच्या मानधनाबाबत वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस केलेल्या उपरोक्त अ, ब, व क, या शिफारशी मान्य कराव्यात असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[१४]** **सन २००५-०६या वर्षातील विद्यापीठ स्तरावरील राष्ट्रीय सेवा योजननेच्या जिल्हयातील नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर या दोन्ही योजनांच्या हिशेबांची केंद्रीय पध्दतीने हिशेब तपासणी करणे बाबत...**

**टिपणी** राष्ट्रीय सेवा योजना गतिमान होण्यासाठी व हिशेबामध्ये सूसुत्रता यावी व दोन्ही योजनांचे विद्यापीठ स्तरावरील हिशेब शासनास लवकर मिळून विद्यापीठांना अनुदान शासनाकडून लवकरात लवकर देणे सोईचे व्हावे यासाठी विद्यापीठ स्तरावरील राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर या दोन्ही योजनांच्या हिशेबांची तपासणी केंद्रीय पध्दतीने विद्यापीठ स्तरावर करण्याची बाब विचारार्थ.

सदर योजनेची अंमलबजावणी शिवाजी विद्यापीठाने मागील वर्षा पासूनच चालू केलेली असून ती यशस्वी झालेली आहे. संबंधित ऑडीटरनी यासाठी प्रत्येक महाविद्यालयाकडून रुपये ३००/- (+ १०.२०% सर्व्हिस टॅक्ससह ) लेखापरीक्षण शुल्क म्हणून रुपये ३३१/- आकारणी केली आहे.

राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर या दोन्ही योजनांचे केंद्रीय पध्दतीने लेखापरीक्षण विद्यापीठ स्तरावर विद्यापीठाचे लेखापरीक्षक सी.आर.दोशी ॲण्ड कंपनी यांचेकडून प्रती महाविद्यालय लेखापरीक्षण शुल्क रुपये ३००/- + १०.२०% सर्व्हिस टॅक्ससह याप्रमाणे करण्याची शिफारस वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस केली आहे.सदरची शिफारस व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र.[१४]** **सन २००५-०६ या वर्षातील विद्यापीठ स्तरावरील राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्ह्यातील नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर या दोन्ही योजनांच्या हिशेबांची केंद्रीय पध्दतीने हिशेब तपासणी करण्याबाबत वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस केलेल्या शिफारशी आणि लेखापरीक्षक सी.आर.दोशी ॲण्ड कंपनी यांना संबंधित महाविद्यालयाने लेखापरीक्षण शुल्क रुपये ३००/- + १०.२०% सर्व्हिस टॅक्ससह देण्याची शिफारस मान्य करण्यात यावी असे ठरले.**

**विषय क्र.[१५]** **३१ मार्च २००६ अखेर विविध फंड निर्माण करण्याबाबत...**

**टिपणी** वित्त व लेखा समितीने खालील राखीव निधी निर्माण करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केली आहे.सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी सादर.

(१) University Development Fund (२) Apatkalin Nidhi (३) Furnture, Fixture & Equipment Fund (४) Students Welfare Fund (५) Research & Development Fund (६) Karamchari Kalyan Nidhi (Employee Welfare Fund)

**ठराव क्र.[१५]** **University Development Fund, Apatkalin Nidhi, Furnture, Fixture & Equipment Fund, Students Welfare Fund, Research & Development Fund and Karamchari Kalyan Nidhi (Employee Welfare Fund) हे राखीव निधी निर्माण करण्याची वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस मान्य करण्यात यावी असे ठरले.**

विषय क्र.[१६] **सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षातील युवा महोत्सवाकरिता झालेल्या खर्चाबाबत...**

(टिपणी : विद्यापीठाचा दुसरा युवा महोत्सवाचे यजमानपद लोकमंगल बायोटेक्नॉलॉज, कॉलेज, वडाळा यांना देण्यात आले होते. सदरचा युवा महोत्सव दिनांक २३/१०/२००५ ते २४/१०/२००५ या कालावधीत सदर महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विद्यापीठाकडून लोकमंगल बायोटेक्नॉलॉजी कॉलेज वडाळा यांना रुपये ५०,०००/- तसलमात देण्यात आली होती. सदरच्या महाविद्यालयाने युवा महोत्सवासाठी रुपये १,४९,१४४/- खर्च केला असून जादा खर्चाचा परतावा मागितला आहे, वित्त व लेखा समितीने जादा खर्च रुपये १०,०००/- देण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केली आहे. सदरची शिफारस व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी सादर.)

ठराव क्र.[१६] **सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षातील युवा महोत्सवाकरिता रु.१०,०००/- जादा झालेला खर्च संबंधित महाविद्यालयास देण्याची वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस मान्य करावी असे ठरले.**

विषय क्र.[१७] **परीक्षा विभागासाठी Software खरेदी करण्याबाबत....**

(टिपणी :सदरचा विषय दि.१९/१/२००६ रोजीच्या खरेदी समितीपुढे ठेवण्यात आला असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला.

परीक्षेचे काम वेळेत व अचूक होण्याच्या दृष्टीने M/s.Core Infosys Pvt.Ltd.Kolhapur यांचेशी करार करण्यास मान्यता देण्यात आली. सदर करार रु ४ लाख याप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आली. इतर कंपन्याचे दर M/s.Core Infosys Pvt.Ltd.या कंपनी पेक्षा कमी आहेत पंरतू परीक्षेच्या कामाच्या Software चा अनुभव संबंधिताना नाही व यांनी शिवाजी विद्यापीठ व मणिपाल विद्यापीठाना परीक्षेचे Software पुरविले आहे, त्यामुळे M/s.Core Infosys Pvt.Ltd.यांचे दर जास्तीचे असले तरी विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी M/s.Core Infosys Pvt.Ltd.यांच्याकडून Software घेण्यास वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.

सबब सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

ठराव क्र.[१७] **परिक्षा विभागासाठी M/s. Core Infosys Pvt. Ltd., Kolhapur यांच्याकडून Software खरेदीबाबत वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस मान्य करण्यात यावी असे ठरले.**

**विषय क्र.[१८]** **SQL Server Class Machine खरेदीबाबत....**

(टिपणी : सदरचा विषय दि.१९/१/२००६ रोजीच्या खरेदी समितीपुढे ठेवण्यात आला असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला.

M/s.Compuex Systems, Solapur यांचेकडून IBM make SQL Server Class Machine रु.१,६८,५००/- प्रती नगास तसेच Windows 2003 for 10 users व SQL Server for 10 users अनुक्रमे रु.१६,०००/- व रु.४०,०००/- या किंमतीस दोन सेट खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.

सदरचा विषय वित्त व लेखा समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आला असता त्यावर संबंधित विक्रेत्यांशी बोलणी करुन दराची पुर्नरचना झाली किंवा कसे याबाबत त्याचेकडून पत्र घेवून व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करण्याची शिफारस करण्यात आली. बजेट नंतर संगणकाच्या किंमती वाढल्या आहेत. तरी सुध्दा ठरलेल्या किंमतीस मशिन्स व सॉफ्टवेअर देण्याचे मान्य केले आहे.

सबब सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

**ठराव क्र.[१८]** **M/s.Compuex Systems, Solapur यांचेकडून IBM make SQL Server Class Machine रु.१,६८,५००/- प्रती नगास तसेच Windows 2003 for 10 users व SQL Server for 10 users अनुक्रमे रु.१६,०००/- व रु.४०,०००/-प्रती सेटनुसार या किंमतीस दोन सेट खरेदी करण्याबाबत वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस मान्य करण्यात यावी असे ठरले.**

[कृ.मा.प.]

**विषय क्र.[१९] Digital Duplicator खरेदी करण्याबाबत..**

(टिपणी : सदरचा विषय दि.१९/१/२००६ रोजीच्या खरेदी समितीपुढे ठेवण्यात आला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

M/s. Arpan Communication ही स्थानिक फर्म असून त्यांच्याकडून घेण्यात आलेल्या L.C.D. ची विक्री नंतरची सेवा समाधानकारक आहे. तसेच एका वर्षानंतर मेंटनन्स चार्जेस कमी असल्याने M/s. Arpan Communication यांच्या मार्फत M/s. Techmart Systems Co. New Delhi यांचेकडून रु.१,१९,०१४/- (+१०%CST) (जकात वगळून) या दराने डिजीटल प्रिंटर खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. सदर खरेदी ही डी.एस.टी. रेट कॉन्ट्रक्ट मधील दराप्रमाणे करावयाची आहे.

सदरचा विषय वित्त व लेखा समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आला असता त्यावर संबंधित विक्रेत्यांशी बोलणी करुन दराची पुर्नरचना झाली किंवा कसे याबाबत त्यांचेकडून पत्र घेवून व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करण्याची शिफारस करण्यात आली.

ह्यसदर विक्रेत्याने दरात कोणताही बदल होणार नाही कारण डी.एस.टी. रेट कॉन्ट्रक्ट प्रमाणे दर हे वर्षासाठी नक्की केले जातात असे कळविले आहे. तसेच पेमेंटच्या अटी डी. एस. टी. प्रमाणे असतील.

सबब सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

**ठराव क्र.[१९] M/s. Arpan Communication ही स्थानिक फर्म असून त्यांच्याकडून घेण्यात आलेल्या L.C.D. ची विक्री नंतरची सेवा समाधानकारक असल्याने आणि एका वर्षानंतर मेंटनन्स चार्जेस कमी असल्याने M/s. Arpan Communication यांच्या मार्फत M/s. Techmart Systems Co. New Delhi यांचेकडून रु.१,१९,०१४/- (+१०%CST) (जकात वगळून) या दराने डिजीटल डुप्लीकेटर डी.एस.टी. रेट कॉन्ट्रक्ट मधील दराप्रमाणे खरेदी करण्याबाबत वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस मान्य करण्यात यावी असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[२०]** **Laptop खरेदीबाबत....**

(टिपणी : सदरचा विषय दि.१९/१/२००६ रोजीच्या खरेदी समितीपुढे ठेवण्यात आला असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला

M/s. HCL Infosystems Ltd., Solapur यांचेकडून रु.४५,०००/- प्रत्येकी याप्रमाणे दोन नग Laptop खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.

सदरचा विषय वित्त व लेखा समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आला असता त्यावर संबंधित विक्रेत्यांशी बोलणी करुन दराचीपुर्नरचना झाली किंवा कसे याबाबत त्याचेकडून पत्र घेवून व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करण्याची शिफारस करण्यात आली. बजेट नंतर Laptop च्या किंमती वाढल्या आहेत. तरी सुध्दा ठरलेल्या किंमतीस Laptop देण्याचे मान्य केले आहे.

सबब सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

**ठराव क्र.[२०]** **वित्त व लेखा समितीच्या शिफारशीनुसार दोन Laptop खरेदीस मान्यता देण्यात यावी असे ठरले.**

**विषय क्र.[२१]** **मायक्रोग्राफची निगराणी रक्कम अदा करण्याबाबत...**

**टिपणी** एम.सी.ए. विभागातील संगणक व प्रिंटरच्या बाबतीत दि.२४/२/२००४ ते २३/२/२००५ या कालावधीसाठी निगराणी करार केला होता. त्याबाबत निगराणी रककम अदा करण्याबाबत विभागप्रमुखांनी पत्र दिले होते. त्यावर संगणक बंद असल्यास दर दिवशी रु १००/- दंड आकारण्याची तरतूद आहे. तरी बंद असलेल्या संगणकाच्या कालावधीचा विचार करुन दंडासंबंधित विभागप्रमुखांनी मायक्रोग्राफशी पत्रव्यवहार करुन त्याचा अहवाल वित्त व लेखासमितीच्या समोर ठेवला. वित्त व लेखा समितीसमोर मायक्रोग्राफचे श्री.कुलकर्णी व सध्याचे एम.सी.ए.चे विभाग प्रमुख डॉ.पी.बी.जोशी यांना बोलविण्यात आले होते. त्यांची मते घेतल्यानंतर मायक्रोग्राफने सादर केलेल्या रु.५४,७५०/- च्या बिलापोटी रु.४०,०००/- ची रक्कम अदा करण्याची शिफारस तसेच डॉ.पी.बी.जोशी व डॉ.एल.पी.देशमुख यांचे लेख्री मते व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ पाठविण्याची शिफारश वित्त व लेखा समितीने केली.सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी.

**ठराव क्र.[२१]** **मायक्रोग्राफ निगराणीची रक्कम रु.५४,७५०/- च्या ऐवजी रु.४०,०००/- रक्कम वित्त व लेखा समितीच्या शिफारशीनुसार अदा करण्यास मान्यता देण्यात यावी असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[२२] कॉपीयर मशीनचा देखभाली करार नुतनीकरणाबाबत ....**

(टिपणी : सदरचा विषय दि. १९/०१/२००६ रोजीच्या खरेदी समितीपुढे ठेवण्यात असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला

विद्यापीठाकडे असलेल्या कॉपीयर मशीनचा निगराणी करार मे. आय. पी. इंटरप्रायझेस, सोलापूर यांना दि.१ जानेवारी २००६ पासून (एक वर्षासाठी) प्रत्येक प्रतीस ३८ पैसे याप्रमाणे निगराणी करण्यास मान्यता देण्यात आली.

सदरचा विषय वित्त व लेखा समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आला असता त्यावर मा. कुलसचिव व मा. वित्त व लेखा अधिकारी यानी मे. आय. पी.इंटरप्रायझेस, सोलापूर यांचेशी चर्चा करुन सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात आली. मे. आय. पी.इंटरप्रायझेस, सोलापूर यांच्याशी चर्चा केली असता सदरचे फर्मने प्रत्येक प्रतीस ३८ पैसे याप्रमाणे निगराणी करण्याचे मान्य केलेले आहे. सदरच्या फर्मचे पत्र सोबत जोडलेले आहे. सबब सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

**ठराव क्र.[२२] मे. आय. पी. एंटरप्रायझेस, सोलापूर यांची प्रत्येक प्रतीस ३८ पैसे याप्रमाणे कॉपीयर मशीनचा निगराणी करार नुतनीकरणास वित्त व लेखा समितीच्या शिफारशीनुसार मान्य करण्यात यावे असे ठरले.**

**विषय क्र.[२३] बँकेतील ठेवीबाबत...**

**टिपणी** दि १/१२/२००५ च्या वित्त व लेखासमितीच्या ठराव क्र.१ अन्वये विद्यापीठाच्या ठेवी १८० दिवसासाठी ठेवण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि विद्यापीठाची त्या त्या वेळेची जमा रक्कम व त्या कालावधीसाठी खर्चासाठी लागणारी रक्कम विचारात घेता विद्यापीठाची शिल्लक रक्कम बँकमध्ये ठेव स्वरुपात किती दिवस ठेवावी याबाबतचे अधिकार मा. वित्त व लेखाधिकारी व मा.कुलगुरुंना द्यावेत याबाबतची शिफारस वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस केली आहे सदरची बाब मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र.[२३] विद्यापीठाकडे जमा होणारी रक्कम व खर्चासाठी लागणारी रक्कम विचारात घेऊन विद्यापीठाची शिल्लक रक्कम बँकेमध्ये ठेव स्वरुपात ठेवण्याबातचे अधिकार मा.कुलगुरु, मा.कुलसचिव व मा. वित्त व लेखा अधिकारी यांना देण्यात यावेत असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[२४]** **रोजगार व स्वयंरोजगार केंद्र सोलापूर यांच्या रोजगार उत्तेजनेखाली सोलापूर विद्यापीठामध्ये नियुक्त केलेल्या प्रशिक्षणार्थीची बाब माहितीसाठी सादर...**

**टिपणी** रोजगार व स्वयंरोजगार केंद्र सोलापूर यांनी बेरोजगार युवकांना रोजगारसाठी उत्तेजित करण्याची बाब विचारात घेऊन बेरोजगार युवकांना रोजगार मिळावा या उदद्शाने रोजगार उत्तेजन योजना अंमलात आणली. या या योजनेतंर्गत सोलापूर विद्यापीठामध्ये मार्च २००६ ते सप्टेंबर २००६ या कालावधीसाठी एकूण ३० प्रशिक्षणार्थी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशिक्षणार्थीचा कालावधी हा सहा महिन्यांचा असून त्यांना एकूण रु.२०००/- इतके विद्या वेतन दिले जाते. सेवा योजन कार्यालयाकडून संगणक तज्ञ उमेदवारास रु.७००/- पदवीधर उमेदवारास रु.५००/- बारावी पास उमेदवारास रु.३००/-, इतके विद्यावेतन दिले जाते. विद्यापीठामध्ये सर्व संगणकमध्ये तज्ञ असणाऱ्या उमेदवारांची नियुक्ती केलेली असल्यामुळे प्रत्येकी रु.१३००/- प्रमाणे प्रशिक्षाणार्थीसाठी दरमहा रु.३९,०००/- तर सहा महिन्यांसाठी रु.२,३४,०००/- इतका खर्च विद्यापीठ फंडातून होईल.या योजनेखाली येणाऱ्या खर्चास मा.कुलगुरु यांची मान्यता घेतली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेपुढे माहितीसाठी सादर.

**ठराव क्र.[२४]** **सदरच्या विषयाची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**<u>आयत्या वेळेचे विषय :-</u>**

**विषय क्र.[२५]** **करिअर ॲडव्हान्समेंट स्किम प्रक्रिया सुरु करणेबाबत...**

(शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक NGC/1298/46/99 /विशि-4 दि.१३/०६/२००० व दि.२४/०८/२००० तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी विहीत केलेल्या व शासनाने दिलेल्या आदेशाचे अधिन राहून शिवाजी विद्यापीठातील शिक्षकांना प्रपाठक आणि प्राध्यापक पदावर पदोन्नती देण्यात आलेल्या आहेत.

शासन निर्णय क्रमांक NGC/1004/(94/2004)/UNI-1 दि.२२/०७/२००४ नुसार सोलापूर विद्यापीठाची स्थापना झाली आणि प्रत्यक्ष कामकाजास दि.०१/०८/२००४ पासून सुरुवात झाली. महाराष्ट्र शासन अधिसूचना NGC/1004/(94/2004)/UNI-1 नुसार जोपर्यंत सोलापूर विद्यापीठाचे नियम तयार होत नाहीत तोपर्यंत शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांचेच नियम सोलापूर विद्यापीठास लागू राहतील. त्यानुसार करिअर ॲडव्हान्समेंट स्किम मधील तरतुदीप्रमाणे पदोन्नती देण्यासाठी सदरील स्किमची प्रक्रिया सोलापूर विद्यापीठामार्फत सुरु करण्यात यावी. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. )

**ठराव क्र.[२५]** **करिअर ॲडव्हान्समेंट स्किमची प्रक्रिया सोलापूर विद्यापीठामार्फत सुरु करण्यात यावी असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[२६] विद्यापीठातील अधिकारी वर्ग यांना देण्यात येणाऱ्या सोयीबाबत...**

(दि.२७/०२/२००६ रोजी वित्त व लेखा समितीच्या बैठकीतील ठराव क्र.७ मध्ये सदर विषयांवर चर्चा होऊन याबाबत प्रस्ताव स्वतंत्रपणे व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी पाठवावा अशी शिफारस करण्यात आली. त्यानुसार सोलापूर विद्यापीठातील मा.कुलगुरु, मा.कुलसचिव, मा.संचालक म.व वि.वि.मंडळ, मा.वित्त व लेखा अधिकारी आणि परिक्षा नियंत्रक यांना मोबाईल सेवा, टेलिफोन सेवा, तसेच वाहनांची सोय उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदरची बाब माहितीसाठी विचारार्थ सादर.)

ठराव क्र.[२६] **विद्यापीठातील मा.कुलगुरु, मा.कुलसचिव, मा.संचालक म.व वि.वि.मंडळ, परीक्षा नियंत्रक आणि मा.वित्त व लेखा अधिकारी ही पदे अत्यंत महत्वाची असल्याने या पदावरील अधिकाऱ्यांना विद्यापीठाच्या कामकाजानिमित्त टेलिफोन सेवा, मोबाईल सेवा, तसेच वाहनांची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच त्यांच्या वापरावर कोणतीही मर्यादा घालण्यात येवू नये असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[२७]  शासनाकडून प्राप्त रु.२ कोटी च्या रकमेबाबत....**

(टिपणी : शासनाकडून बांधकाम व प्रशासकीय खर्चासाठी रु.२कोटी प्राप्त झाले आहेत. शासनाच्या आदेशाप्रमाणे त्यासाठी स्वतंत्र खाते उघडण्यात आले आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडिया,कोंडी शाखा येथे खाते क्र.एस.यु.०६ या खात्यात सदरची रक्कम तूर्त जमा केली आहे. विविध बँकांचे मुदत ठेवीवरील व्याजाचे दर खालील जोडलेल्या तक्त्यानुसार आहेत.

| मुदत | बँक ऑफ बडोदा | दि.युनायटेड वेस्टर्न बँक लि. | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | स्टेट बँक ऑफ इंडिया | बँक ऑफ इंडिया |
|---|---|---|---|---|---|
| ४६ दिवस | ४.७५ % | ५.७५% | ५.७५% | ४.७५% | ५.००% |
| ९१ दिवस | ५.००% | ६.२५% | ६.२५% | ५.५०% | ५.५०% |
| १८१ दिवस | ५.५०% | ६.७५% | ६.७५% | ५.५०% | ५.७५% |

बांधकाम सुरु होण्यास थोडा कालावधी लागणार असल्यामुळे जास्त व्याजदराचा विचार करता सदरची रक्कम खालील प्रमाणे सेंट्रल बँक ऑफ इंडिया व युनायटेड वेस्टर्न बँक लि. यांच्याकडे ठेवण्यास मान्यता असावी.)

| मुदत | व्याज | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | युनायटेड वेस्टर्न बँक लि. |
|---|---|---|---|
| ४६ दिवस | ५.७५ % | १० लक्ष | १० लक्ष |
| ९१ दिवस | ६.२५ % | २० लक्ष | २० लक्ष |
| १८१ दिवस | ६.७५ % | ७० लक्ष | ७० लक्ष |
| **एकूण ठेव** | | १ कोटी | १ कोटी |

**ठराव क्र.[२७]  सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बॅकेमध्ये रु.१ कोटी (रु.१० लक्ष - ५.७५% व्याजदराने ४६ दिवसांकरिता, रु.२० लक्ष - ६.२५% व्याजदराने ९१ दिवसांकरिता व रु.७० लक्ष - ६.७५% व्याजदराने १८१ दिवसांकरिता) तसेच युनायटेड बँक लि. या बॅकेमध्ये रु. १ कोटी (रु.१० लक्ष - ५.७५% व्याजदराने ४६ दिवसांकरिता, रु.२० लक्ष - ६.२५% व्याजदराने ९१ दिवसांकरिता व रु.७० लक्ष - ६.७५% व्याजदराने १८१ दिवसांकरिता) मुदत ठेव म्हणून ठेवण्यात यावी असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[२८]** **मा. कुलसचिव यांचेकरिता वाहन खरेदीबाबत...**

(मा.कुलसचिव यांच्यासाठी वाहन खरेदी करणेबाबत अधिकृत विक्रेते यांचेकडून दरपत्रके मागविले असता, Indigo GSX-E-III वाहनासाठी मे. स्टरलिंग मोटर्स, सोलापूर व मे. बी. यु. भंडारी, पुणे यांचेकडून आलेल्या दरपत्रकांची तुलना करता, मे. बी. यु. भंडारी, पुणे यांचेकडील दर कमी आहेत. तरी मे. बी. यु. भंडारी, पुणे यांच्याकडून सदर वाहन सुधारित अंदाजपत्रकीय तरतूदीच्या अधीन राहून खरेदी करण्यास खरेदी समितीने मान्यता दिली आहे. तसेच वित्त व लेखा समितीच्या वतीने मा.कुलगुरुसाो यांनी वाहन खरेदीची शिफारस केली आहे. सबब सदरची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

**ठराव क्र.[२८]** **मा. कुलसचिव यांचेकरिता Indigo GSX-E-III (पेट्रोल) हे वाहन मे. बी. यु. भंडारी प्रा. लि. पुणे यांच्याकडून खरेदी करण्यास मान्यता देण्यात यावी असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**

**विषय क्र.[२९] मल्टी क्लासरुम कॉम्प्लेक्स इमारतीसाठी वाढीव दराने स्टील खरेदीबाबत.**

(टिपणी - सोलापूर महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या रकमेतून मल्टीक्लासरुम कॉम्प्लेक्स इमारतीचे बांधकाम सुरु आहे. व्यवस्थापन परिषदेच्या दि.२७/१२/०५ च्या बैठकीत टाटा स्टीलचे सोलापूरातील घाऊक विक्रेते दर्गोपाटील ॲन्ड सन्स यांचेकडूनची स्टील खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली होती. श्री. एस. पी. मोहोळकर (Structural Engineer) व आर्किटेक्ट श्री. यादगिरी कोंडा यांना एकूण ९८.५० टन स्टीलची गरज लागेल असे कळविले आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ४१.५० टन स्टीलची खरेदी करण्यात आली आहे. मे. दर्गोपाटील ॲन्ड सन्स यांनी दिलेली दर २८/२/२००६ पर्यंत लागू होते.

श्री. एस. पी. मोहोळकर (Structural Engineer) व श्री. यादगिरी कोंडा (Architect) यांनी दुसऱ्या टप्प्यासाठी २९ टन स्टीलची खरेदी करण्याबाबत सुचविले आहे. त्याप्रमाणे मार्च ०६ मध्ये मे. दर्गोपाटील ॲन्ड सन्स यांचेशी संपर्क साधला असता स्टीलचे भाव वाढले असे कळले. स्टील दरवाढीचे पुढील कारणास्तव झालेली आहे. (१) वाहतूक करताना सध्या १८ टनाऐवजी सरकारच्या नियमाप्रमाणे ९ टनच माल वाहतूक करता येते. त्यामुळे वाहतूक खर्च वाढला आहे. तसेच (२) बांधकाम साहित्याचे दर वाढले आहे. त्यामुळे स्टीलच्या दरामध्येही वाढ झालेली आहे.

स्टीलच्या वाढीव दराचा प्रस्ताव खरेदी समितीच्या २०/३/०६ व २२/३/०६ रोजीच्या बैठकीत ठेवला असता मे. दर्गोपाटील ॲन्ड सन्स यांच्याकडून कळविलेले सुधारित दर टाटा स्टील कंपनीच्या प्रोजेक्टसाठीच्या सुधारित दरानुसार आहेत याबाबत विचारणा करुन दुसऱ्या टप्प्यासाठी २९ टन सुधारित दराने {एकूण मुल्य रु.८,५७,८५०/-} याप्रमाणे खरेदीस मान्यता देण्यात आली. वित्त व लेखा समितीच्या वतीने मा.कुलगुरु यांनी स्टील खरेदीस व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.

मे. दर्गोपाटील ॲन्ड सन्स यांच्याकडे चौकशी केली असता प्रोजेक्टसाठी एकावेळेस स्टीलची खरेदी ९० टनाच्या वर असेल तरच टाटा कंपनी विशेष दराचा विचार करते. विद्यापीठाच्या पहिल्या टप्प्यातील ४१.५ टनाच्या स्टील खरेदीवेळेस खास बाब म्हणून मे. दर्गोपाटील ॲन्ड सन्स यांनी कंपनीकडून सवलत घेतली होती.

आता दुसऱ्या टप्प्यात २९ टनाची स्टील खरेदीसाठी कंपनीच्या प्रोजेक्टसाठी असलेला दर लागू होणार नाही असे सांगितले आहे. तसेच स्टीलच्या वाढीव दराची कारणे वर नमूद केलेली आहेत.

**[कृ.मा.प.]**

| steel | Qty.in Ton | Rate Per Ton (upto 28/2/06) | Revised Rate Per Ton | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 6mm | 3.5 | 26,000/- | 29,500/- | 1,03,250/- |
| 8mm | 2.00 | 28,400/- | 30,200/- | 60,400/- |
| 10mm | 7.00 | 27,900/- | 29,600/- | 2,07,200/- |
| 12mm | 3.00 | 27,900/- | 29,600/- | 83,700/- |
| 16mm | 5.00 | 27,400/- | 29,400/- | 1,47,000/- |
| 20mm | 5.00 | 27,400/- | 29,200/- | 1,46,000/- |
| 25mm | 0.50 | 27,400/- | 29,200/- | 14,600/- |
| 32mm | 3.00 | 27,900/- | 30,200/- | 90,600/- |

वरील प्रमाणे सुधारित दराने स्टील खरेदीसाठी एकूण रुपये ८,५७,८५०/- खर्च येणार आहे. मे. दर्गोपाटील ॲण्ड सन्स, सोलापूर यांचेकडून रुपये ८,५७,८५०/- ची स्टील खरेदी बाबत विचारार्थ व खरेदीस मान्यता असावी.

**ठराव क्र.[२९]** **मे.दर्गोपाटील ॲण्ड सन्स, सोलापूर यांचेकडून रुपये ८,५७,८५०/- चे स्टील खरेदी करण्यास मान्यता देण्यात यावी असे ठरले.**

**विषय क्र.[३०]** **डी.जी.बी.दयानंद लॉ कॉलेज,सोलापूर येथे सुरु होणाऱ्या एल.एल.एम.या कोर्सच्या शैक्षणिक शुल्क व प्रवेश क्षमता मंजूर करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ...**

**टिपणी** डी.जी.बी.दयानंद लॉ कॉलेज,सोलापूर येथे जून २००६ पासून एल.एल.एम.कोर्स सुरु होत आहे. सदरचा कोर्स हा स्वावलंबी तत्वार महाराष्ट्र शासनाने सोविसो-२००५/(११/०५)मशि-३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग-मंत्रालय विस्तार भवन,मुंबई यांच्या दि.२२ जून २००५ पत्राने मान्यता दिलेली आहे. सदर कोर्स हा स्वावलंबी तत्वावर सुरु होत असल्याने शैक्षणिक शुल्क व इतर फी ठरविण्याकरिता दि.२/१/२००६ रोजी त्रिसदस्यीय समिती नेमलेली होती. त्या समितीने एल.एल.एम.कोर्सकरिता शैक्षणिक शुल्क व विद्यार्थी क्षमता ह्या बाबत अहवाल दि.२/१/२००६ रोजी सादर केलेला आहे (सोबत समितीच्या अहवाल जोडला आहे). सदर अहवालाच्या अनुषंगाने जून २००६ पासून एल.एल.एम.कोर्स करिता आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्क व प्रवेश क्षमता ही बाब मागील विद्यापरिषदेच्या आयत्या वेळेच्या विषयामध्ये घेतली होती परंतु त्यावर चर्चा न झाल्याने सदर बाब महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ २८(V) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र.[३०]** **डी.जी.बी.दयानंद लॉ कॉलेज,सोलापूर येथे सुरु होणाऱ्या एल.एल.एम.या कोर्सच्या शैक्षणिक शुल्क व प्रवेश क्षमता मंजूर करण्यात यावी असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**

श्री. व्ही.तिरुपती यांनी विद्यापीठातील सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य, विद्यापरिषद सदस्य, सर्व विभागप्रमुख,विद्यापीठाचे सर्व अधिकारी आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विद्यापीठाचा प्रथम दीक्षांत समारंभ उत्कृष्टपणे पार पाडल्याबद्दल आभार मानले.

मा.कुलसचिव यांनी डॉ.पी.जे.केचे,सहसंचालक,उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग,कोल्हापूर. यांनी मार्गदर्शन केल्याबद्दल आभार मानले तसेच सर्व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे आभार मानून मा.कुलगुरु यांच्यावतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
**डॉ. आय. एस. स्वामी**
**अध्यक्ष.**